# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/ २०१५** **दिनांक २२.०६.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २२.०६.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ १६३८/ २०१५, दिनांक २२/०६/२०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २२.०६.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **सी.सी.टी.व्ही. सिस्टीम खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांवर चर्चा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६०** आजचे सभेत सी.सी.टी.व्ही. च्या निविदा तसेच नव्याने घ्यावयाचे संरक्षण साहित्य याबाबत सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले–

(१) संस्थान परिसरामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कायमस्वरुपी होणे अपेक्षित असल्यामुळे व या यंत्रणेची व्याप्ती पहाता याबाबत अधिक सखोल अभ्यास होऊन, जाणकार सल्लागाराकडून सल्ला घेणेची आवश्यकता वाटते. तसेच याकामी प्राप्त झालेल्या निविदांच्या दरांचे लिफाफेही उघडणेत आलेले नाहीत, यामुळे ही निविदा प्रक्रिया रद्द करणेत यावी.

(२) सी.सी.टी.व्ही. खरेदीकामी पुनर्निविदा प्रक्रियेचे टेंडर डॉक्युमेंट तयार करणे, प्री-बीड मिटींगकरीता शंका निरसन करणे, गरजेनुसार शुद्धीपत्रक काढणे, प्राप्त निविदेचे टेक्निकल इव्हल्युशन करणे तसेच सल्लागार नेमणुकीचे टेंडर डॉक्युमेंट तयार करणे याबाबतची सेवा घेणेसाठी संबंधित जाणकाराकडून कोटेशन मागविणेत यावे.

(३) नियुक्त केलेल्या सल्लागारांकडून नव्याने सर्वेक्षण करुन सी.सी.टी.व्ही. कॅमे-यांची आवश्यकता पडताळणी करणे व त्या अनुषंगाने काढावयाच्या निविदांची प्रारुपे तयार करणे तसेच त्यामध्ये यासाठी आवश्यक असणा-या अटी व कार्यपद्धती याचा काटेकोर अंतर्भाव होईल याची खबरदारी घेणेत यावी.

(४) निविदा प्रारुपामध्ये पुरवठादारांस करावयाच्या रकमेच्या अदायगीबाबतचे नियंत्रण स्पष्टपणे नमुद करणेत यावे तसेच प्रारुपामध्ये प्रस्तावित करावयाच्या सी.सी.टी.व्ही. उपकरणांचे तांत्रिक स्पेसिफिकेशन स्पष्टपणे नमुद होईल याची खबरदारी घेणेत यावी.

(५) सल्लागार नियुक्त करणेकामी सल्लागाराची जबाबदारी व कर्तव्ये यांबाबत सर्वसाधारणपणे आवश्यक असलेल्या अटी व शर्ती, काटेकोरपणे तपासण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणांकडील माहिती संकलित करुन त्याप्रमाणे सल्लागार नेमणूक आदेशात स्पष्टपणे नमूद करावे, प्रकल्प सल्लागार नेमण्याचे टेंडर तयार करणे इ. सर्व गोष्टीची पुर्तता करण्यासाठी तज्ञांकडून कोटेशन मागविण्यात यावे.

(६) याबाबतची कार्यवाही सल्लागारांकडून दोन दिवसात पूर्ण होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

याशिवाय संरक्षण साहित्यांबाबतचे निविदे प्रक्रियेसंदर्भात व सी.सी.टी.व्ही संदर्भात आलेली तांत्रिक अडचण ध्यानात घेता या प्रकरणांतील यादीचा फेर आढावा घेण्यात यावा तसेच पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांच्या सुचनेप्रमाणे निविदेमध्ये आवश्यक त्या अटी, शर्ती व अन्य तांत्रिक बाबी यांचा स्पष्ट उल्लेख असलेली निविदेची प्रारुपे पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडे अभिप्रायासाठी सुपूर्द करणेत येऊन, त्याप्रमाणे तात्काळ निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.१६० सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी